दै. प्रजावाणी दि. 10/11/2023

# सोनसाखळी चोरांना पोलीसांनी केले जेरबंद!

## भाग्यनगर हद्दीतील ६ गुन्ह्यांची चोरट्यांनी दिली कबूली

दिवाळी सणाच्या तोंडावर बाजारात ग्राहकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन सोनसाखळी हिसकावून नेणार्या चोरट्यांनी आपली मोहीम वेगाने सुरु केली आहे. गेल्या काही दिवसांत सोनसाखळी चोरण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीसांनी विशेष पथके स्थापन करुन सोनसाखळी चोरांना जेरबंद केले आहे. भाग्यनगर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे या चोरट्यांचा छडा लावून यातील आरोपींपर्यंत पोहोचण्याचे काम केले आहे. त्यामुळे सोनसाखळी हिसकावण्याच्या घटनांमधील चोरटे पोलीसांच्या हाती लागले आहेत.

याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. सोनसाखळी चोरण्याच्या वाढत्या घटनांचा छडा लावण्यात पोलीसांना यश आले आहे. ८ नोव्हेंबर रोजी याप्रकरणी दाखल झालेल्या एका गुन्ह्यात तपास करताना पोलीसांना मालेगाव रोडवर दोन अनोळखी इसमांना बुलेट मोटारसायकलवरुन संशयीतरित्या जाताना पाहिले. पोलीसांनी त्यांना पकडून त्यांची चौकशी केली. तौफिक खान अयुबखान (वय २४, रा. बिलालनगर, देगलूरनाका, नांदेड) व सलमान असलम खान (वय २८, रा. अदनान गार्डन धनेगाव, नांदेड) या दोघांना ताब्यात घेऊन पोलीसांनी चौकशी केली असता भाग्यनगर ठाण्याच्या हद्दीत त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या ६ गुन्ह्यांची कबुली दिली. या गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या दोन्ही बुलेट मोटारसायकल बोधन (तेलंगणा) येथून चोरल्याचे त्यांनी सांगितले. तसेच एक शाईन मोटारसायकल हिंगोली येथून चोरल्याची कबूली त्यांनी दिली. त्यांच्याकडून ४९ ग्रॅम सोने अंदाजे १ लाख ५० हजार रुपये किंमतीचे दागिणे व दोन मोटारसायकली असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिवाळीचा सण असल्यामुळे बाजारात खरेदीसाठी झालेल्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर महिला भगिणींनी स्वतःचे दागिणे सांभाळण्याबाबत योग्य ती काळजी व खबरदारी घ्यावी तसेच प्रामुख्याने सराफा व्यापार्यांनी रोख रक्कम नेताना गरज भासेल तेथे पोलीसांची मदत घ्यावी, याबाबत त्यांनी पोलीसांना कळवले तर आम्ही त्यांना आवश्यक ते संरक्षण देऊ अशी ग्वाही श्रीकृष्ण कोकाटे यांनी यावेळी दिली. याबाबतीत त्यांनी कोणतीही जोखीम घेऊ नये अथवा हलगर्जीपणा करु नये असे आवाहन पोलीस प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपी अर्जुन शिंदे हा फिर्यादीच्या एक वर्षापासून संपर्कात होता. ऊसतोड करण्यासाठी मजूर पुरवण्याकरीता त्याने फिर्यादीला नांदेड येथे बोलावले. तसेच नांदेड येथे आल्यावर कमी किंमतीत अर्धा किलो सोने देतो असे सांगून फिर्यादीला वरखेड गावाच्या शिवारात बोलावून ७ ते ८ साथीदारांच्या मदतीने १० लाख रुपये बळजबरीने त्याच्याकडून काढून घेतले. याप्रकरणी लिंबगांव पोलीसांनी अर्जुन शिंदे रा. उमरी, राहुल पवार रा. मुदखेड, अनिल मारकुळे रा. वसमत, सुरेश पवार रा. वसमत, पिर्या गोरे, किशन गोरे, लखन एरंडले, सोन्या काळे इत्यादी नावे या गुन्ह्यात निष्पन्न झाली. त्यानुसार अनिल रंगनाथ मारकुळे रा. वसमत याला अटक करण्यात आली असून या गुन्ह्यातील रक्कमेतून खरेदी केलेली हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल जप्त केली आहे.

याशिवाय धर्माबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलीसांनी तीन मोटारसायकलसह सुमारे अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या गुन्ह्यात संशयित नामे साईनाथ मारोती मॅकलवाड (वय १८, रा. मदनूर ता. धर्माबाद) याला

▪पान २ वर